दिनांक :- २१/०६/२००३.

# स्थायी समिति सभा

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा शनिवार दिनांक २१/०६/२००३ रोजी सभा सुचना क्र. ०८ दि. १७/०६/२००३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.४५ वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मोहन म. पाटील हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

## उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मोहन म. पाटील | सभापती |
| २) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | सदस्य |
| ३) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| ४) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |
| ५) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ६) | श्री. वैती चंद्रकांत सिताराम | सदस्य |
| ७) | श्री. तुळशीदास दत्तू म्हात्रे | सदस्य |
| ८) | श्री. चौहाण महेंद्रसिंग | सदस्य |
| ९) | श्री. नलावडे दिनेश द. | सदस्य |
| १०) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ११) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | सदस्य |
| १२) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| १३) | श्रीम हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर उर्फ पुजा प्रताप शिंदे | सदस्या |

## गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |

## रजेचा अर्ज आलेले सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. कोलासो जेम्स इजिदोर | सदस्य |
| २) | श्री. शहा शशिकांत रतीलाल | सदस्य |

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ७५ चे वाचन केले)

**धनराज अग्रवाल :-**

प्रत्येक खात्याचा विषय आहे व ऑडीटर साहेबांनी प्रत्येक खात्यावर काहींना काही सुचना केलेल्या आहेत. त्याबाबत आम्हांला विचारायचे असेल तर आम्हांला उत्तर कोण देणार. सचिव साहेब येथे उपस्थित आहेत ते उत्तर देतील का?

**लिओ कोलासो :-**

अंतर्गत लेखा परिक्षक साहेबांनी येथे माहिती दिली आहे. ती माहिती देणे त्यांना जरुरीचे आहे कारण अंतर्गत लेखा परिक्षकाने वेळोवेळी इंन्स्ट्रक्शन घ्यायच्या असतात. हा मेमो आल्यानंतर सभागृहाला संधी मिळाली आहे. काही वेळा कर्मचाऱ्यांकडून त्रुटी होते किंवा जाणून बुजून त्रुटी करतात. काही आर्थिक प्रकरणे असेल तर आपण योग्य त्या मार्गाने उघडू शकतो व आयुक्त साहेबांना सांगू शकतो. त्या दृष्टीकोनातून हा विषय आपल्यासमोर आला आहे असे मला वाटते.

**मा. सभापती :-**

मागील सभेला अंतर्गत लेखा परिक्षकाचे दोन विषय होते व ते दोन्ही विषय आपण पुढच्या सभेत म्हणजे ह्या सभेत घेतले आहे. कारण मुलतः आपल्याला हा विषय आत्मसात झाला पाहिजे व त्या विषयाचा अभ्यास करायला वेळ पाहिजे होता. आपण शहराचा विकास करण्यासाठी पुढाकार घेतो. इंटरनल ऑडिटरच्या बाबी आहे ते सर्व कागदोपत्री रेकॉर्ड ठेवला पाहिजे व त्याचा अभ्यास आपल्यालाही झाला पाहिजे. म्हणून मागच्या वेळेला आपण हा विषय पुढच्या सभेत घेण्याचे सांगितले. कामकाजात काय अडचणी आहे त्या अडचणीत सहभाग घेऊन व संबंधित अधिका-यांना काय मदत करु शकतो ते आपण बघूया. आरोग्य विभाग, पाणी पुरवठा विभाग, बांधकाम विभाग ह्यांनी कोणत्या पद्धतीने रेकॉर्ड मेंन्टेन केले आहेत ते रेकॉर्ड ह्या निमित्ताने आपल्यासमोर आले आहेत. सन्मा. सदस्य लिओ कोलासोजींनी सांगितले त्यामुळे आपण हा विषय वेगळ्या पद्धतीने आणला आहे.

**महेंद्रसिंग चोहाण :-**

यहा पर जो डे टू डे वर्क का रिपोर्ट दिया है, वह अच्छा है। फायनानशियल वर्क है उसका ढंग से काम हो रहा है। यहा पर सरकारने ऑडिटर दिया है बॅलन्स शिट बनाने के लिए। यहा पर विषय आते है तब इंटरनल ऑडीटर सभागृह में ही बैठते है। इनका जो ऑडीट होता है वो किसी भी कमिटी को पता नही चलता है। लास्ट ईअर का ऑडीट कब आया कुछ भी पता नही है। यहा पर उनका इंटरटेन्टमेंट करके होटल मे खाना खिलाते है और बॅलन्स शिट चेंज करते है। ये बारा महिने के बाद इतना क्वेरी निकाल देना यह सही है क्या? बिल और कॅश पुरा का पुरा निकाला जाता है। मेरा बोलनेका उद्देश बिलकुल स्पष्ट है। इस तरह काम होता नही है। ऑडीटर को विश्वासपात्र समजा जाता है। उनके हातो मे महानगरपालिका का फायनान्स का काम होता है। कॅशिअर इनको लेकर फायनल पेमेन्ट करता है। मार्च, अप्रेल महिने मे बॅलन्स शिट बन गयी है। इस क्वेरी मे जगह जगह पर कमीया बताई है। कहा गया है की, वसुलीची टक्केवारी पन्नास टक्के पर्यंत अनुदान ऐंशी टक्के, वसुलीची रक्कम ऐंशी टक्के पर्यंत अनुदान शंभर टक्के, म्हणजेच वसुली ऐंशी टक्के पेक्षा कमी झाल्याने महागाई भत्ता अनुदान वीस टक्के कमी मिळणार आहे. ऐसे उन्होने लिखा है। कहॉ पर आयुक्त महोदय और उपआयुक्त महोदय की तारिफ भी कि है। चांगले नाही, इस तरह सौ क्वेरी मे लिखा है और स्टाफ जिम्मेदारी से काम नही करता है। हर एक क्वेरी मे ऐसा ही लिखा है। कर विभागात वसुलीची वाढ होत नाही। अगर यह सब क्वेरी वो हर हफ्ते मे देते तो अच्छा होता। आप सभापती साहब इसपर रुलिंग दिजीए। यहा एक दो तकलीफ नही है पचासो तकलिफे है। ठेकेदार का हमारे यहाँ दो ढाई साल से बील पडा है। इस तरह अनेक बात पचासो बार मुझे सुनने को आता है। यह सारा काम इंटरनल ऑडीटर के कहने से होता है। बील पास नही करते है तो कम्प्लाई करो। सभापती साहब आप इनसे पुछिए इनका अधिकार है क्या इस तरह त्रुटीया निकालने का? किसी के पेमेन्ट का रोकनेका इनका अधिकार नही है। यह सब आयुक्त महोदय को बोलनेका यह हमारा स्टाफ नही कर रहा है और बात नही सुनता है। आपने जो रिपोर्ट दिया है उससे इस महापालिकाको क्या फायदा हुआ है। इससे पहिले आपने अब तक ऐसा कोई भी कम्प्लाई रिपार्ट नही दिया है। रिपोर्ट दिया है और वो रिपोर्ट पहुचता है नही ऐसा है क्या? आपने जो यह रिपोर्ट सादर किया है वो कौनसे अधिकार से किया है। और कौनसा अधिकारी अपनी बात सुनता नही है उसका नाम आप बताइये।

**प्रविण वैवुडे :-**

तीन वर्षांच्या वर कोणताही मुद्दा माझ्याकडे निकाली लावण्याकरिता राहिला नाही. फायनानशियल इअर संपल्यानंतर सभागृहाला रिपोर्ट सादर करणे ही माझी जबाबदारी आहे.

**धनराज अग्रवाल :-**

तुम्ही या संदर्भात अधिका-याला पत्र दिले आहे का?

**प्रविण वैवुडे :-**

अधिका-यांना मी कम्प्लाय केले आहे. त्याचा रिपोर्ट आजही माझ्याकडे आहे. मी प्रत्येकाला रिपोर्ट दिला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

प्रत्येक मुद्दा व्यवस्थित घ्या.

**मा. सभापती :-**

शिक्षण विभागाचा विषय अगोदर घेण्यांत यावा.

**आक्षेप क्र. १३ :-**

महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या लेखाबाबत.

**सन्याशिव :-**

अहवालातील संबंधित शेरा आहे की, महानगरपालिकेचे स्वतंत्र शिक्षण मंडळ आहे. परंतु अद्याप मंडळाची स्थापना झालेली नाही. हा विषय महापालिका सचिव यांच्याशी संबंधित असून शिक्षण मंडळ स्थापन करण्याचा अधिकार मा. महापौर ह्यांचा आहे.

**अशोक पाटील :-**

मा. महापौरांकडे प्रस्ताव पाठविला का?

**लिओ कोलासो :-**

मा. महापौरांचे अधिकार त्यांच्या निदर्शनास आणून देणे ही जबाबदारी आपली आहे. तुम्ही आता आपली जबाबदारी महापौर साहेबांकडे ढकलून चालणार नाही.

**सन्याशिव :-**

सचिवांनी प्रस्ताव तयार करुन मा. महापौरांकडे सादर करायचे असते.

**लिओ कोलासो :-**

प्रस्ताव तयार करायला हालचाल करायला पाहिजे. आपणाकडून आवश्यक ती कार्यवाही पूर्ण होणार आहे का?

**अशोक पाटील :-**

ह्या कामात अडचण काय आहे.

**माळी (प्र. उपसचिव) :-**

मा. सभापती महोदय, शिक्षण मंडळ स्थापन करणेचा अधिकार महापालिकेला आहे. त्याबाबत कार्यवाही चालू आहे. प्राथमिक शिक्षण मंडळ स्थापनेबाबत नियमांत स्वतंत्र तरतूद केलेली आहे. शिक्षण मंडळावर कमीत कमी १२ व १६ पेक्षा जास्त असू नये एवढे सदस्य घ्यावेत. प्राथमिक शिक्षण मंडळाच्या १९४९ व १९४७ च्या ॲक्टनुसार आपल्या नगरपालिकेचे पूर्वी शिक्षण मंडळ नव्हते. त्यामुळे आता शिक्षण मंडळात किती सदस्य असावेत अशी विचारणा सचिवांनी शिक्षण संचालक व शासनास केलेली आहे. सदस्य निश्चितीबाबतचा अधिकार शासनाचा आहे. यामुळे शासन जोपर्यंत निश्चिती आदेश देत नाही तोपर्यंत शिक्षण मंडळ स्थापनेस विलंब लागेल.

**लिओ कोलासो :-**

आपल्या शहराच्या बाजूला महानगरपालिका आहे. आपण त्यांच्याकडून मार्गदर्शन घ्या. शिक्षण मंडळासाठी नियम काय आहे.

**माळी (प्र. उपसचिव) :-**

ठाणे महानगरपालिकेत शिक्षण मंडळसाठी नियमांत तरतुद केलेली आहे.

**लिओ कोलासो :-**

आम्ही पण तरतुद करायला तयार आहोत. स्थायी समिती स्थापन झाली आणि अजून ज्या समित्या स्थापन व्हायला पाहिजे त्या समित्या स्थापन झाल्या नाहीत. ते बरोबर वाटत नाही. ह्या कामाचे दायित्व प्रशासनाने वेळीच स्विकारायला पाहिजे होते. तुम्ही आम्हांला सांगा आम्ही हे काम महिना दिड महिन्यात करत आहोत.

**माळी (प्र. उपसचिव) :-**

शासनाकडे आम्ही हा विषय घेऊन जातोय.

**तुळशीदास म्हात्रे :-**

शासनाकडे प्रस्ताव पाठविल्यानंतर हे काम लवकर होईल का?

**मिलन म्हात्रे :-**

मंडळाची सदस्य संख्या किती आहे.

**माळी (प्र. उपसचिव) :-**

कमीत कमी बारा सदस्य व सोळा सदस्यांपेक्षा जास्त सदस्य संख्या घेऊ नये अशी नियमांत तरतुद आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आपण बारा सदस्य का केले सोळा सदस्य का केले नाही.

**मा. सभापती :-**

नियमांत बारा व सोळा सदस्य असे आहे. बारा सदस्य संख्या ठेवली तर ती आपल्या अखत्यातरीतील बाब ठरेल आणि सोळा सदस्य घेतले तर शासनाकडे पाठवायचे असे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्या सदस्यांचा कालावधी किती महिन्यांचा असेल.

**अशोक पाटील :-**

नॉमिनेट संख्या किती व निवडून आलेले सदस्य किती असतील.

**मा. सभापती :-**

पाच वर्षांची मुदत आहे. पाच वर्षापर्यंत चालते. शिक्षण मंडळाची कार्यवाही चालू करण्यांत आली आहे.

**धनराज अग्रवाल :-**

महानगरपालिकेने शाळा बांधल्या आहेत त्याचे भाडे वसुल करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव बांधकाम विभागामार्फत पाठविणे आवश्यक आहे. त्याचे स्पष्टीकरण करा.

**सन्याशिव :-**

हा विषय सार्वजनिक बांधकाम खात्याशी संबंधित असून भाडे वसुलीचा जो रेट ठरवायचा आहे ते आपले इंजिनिअर ठरवतात व त्यांनी तसा प्रस्ताव शासनाकडे पाठवायचा आहे.

**अशोक पाटील :-**

दहा वर्ष आपण त्यांना जागा वापरायला दिली पण भाडे वसुलीकरीता कधी चालना दिलेली नाही.

**लिओ कोलासो :-**

ह्याच्यापूर्वी दोन चार शिक्षण अधिकारी येऊन गेले. त्यांनी त्यांच्या खात्याशी संबंधित असे प्रिपरेशन दिले आहे. तर सार्वजनिक बांधकाम खात्यानं त्याचे फॉलो अप करायला पाहिजे होते.

**दिपक खांबीत :-**

भाडे ठरवून आम्ही सव्वा तीन कोटी रुपयांची मागणी केली आहे. सन १९९३ पासून २००२ पर्यंतचे भाडे ठरवून त्याप्रमाणे मागणी केली आहे.

**लिओ कोलासो :-**

तुम्ही मागणी कोणाकडे केली आहे.

**दिपक खांबीत :-**

उपसंचालक, शिक्षण नाशिक ह्यांच्याकडे मागणी केली आहे.

**लिओ कोलासो :-**

तुम्ही ह्या कामाचे डे-टू-डे किंवा वीक-टू-वीक काय फॉलो अप केले आहे.

**सन्याशिव :-**

हा प्रस्ताव डायरेक्टरकडे जाईल व त्याच्यानंतर शासनाकडे जाईल व शासनाकडून आर्थिक विभागाकडे जाईल व तेथून मंजूरी दिल्यानंतर तो प्रस्ताव शिक्षण विभागाकडे येईल.

**लिओ कोलासो :-**

आपण प्रस्ताव पाठवला आहे पण त्याकरिता आपण पात्र आहोत का नाही?

**सन्याशिव :-**

महापालिकेला भाडे वसुली करण्याचा अधिकार आहे.

**लिओ कोलासो :-**

ह्या प्रस्तावावर कोणीतरी युद्धपातळीवर पाठपुरावा करावा अशी माझी इच्छा आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

शिक्षण मंडळाचा प्रस्ताव आपण करु पण शिक्षण मंडळात बऱ्याच अडचणी आहेत त्या आपल्याला दुर करायला पाहिजे. शिक्षण विभागात क्लार्क नाही ही मोठी समस्या आहे. आपण ह्या खात्यात किती क्लार्क व शिपाई दिले आहेत ते बघा.

**सन्याशिव :-**

आस्थापनाने सोनारे ह्याला निलंबित केले तर त्याचा चार्ज हा दुसऱ्या व्यक्तीला द्यायला पाहिजे होता. त्याने कपाटाच्या चाव्या सोबत घेऊन गेला आहे त्यामुळे अडचण निर्माण झाली आहे.

**गोविंद परब :-**

सोनारे हा लिपीक असल्यामुळे आम्ही त्याला दिलेल्या आदेशात त्याचा चार्ज दुसऱ्या कर्मचाऱ्याने सांभाळावे असे लिहिले नाही.

**लिओ कोलासो :-**

सोनारेला निलंबित केले तेव्हा तुम्ही व्यवहारज्ञान वापरुन त्याच्याकडून चाव्या घेतल्या पाहिजे होत्या.

**सन्याशिव :-**

आजची स्थिती भयानक आहे. शासनाच्या वतीने आम्हाला अनुदान मिळायचे आहे व सर्व कपाटाच्या चाव्या सोनारेकडेच आहेत. त्यामुळे आम्हांला कपाट उघडता येत नाही.

**लिओ कोलासो :-**

आपण म्हणता आजची परिस्थिती भयानक आहे तर आपण ही गोष्ट आयुक्तांच्या निर्दशनास आणली आहे का?

**सन्याशिव :-**

क्लार्क आणि शिपाई आमच्याकडे नाही ही गोष्ट मी आयुक्त साहेबांच्या निर्दशनास आणून दिली आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

किती क्लार्क व शिपाई पाहिजे हे आपण सांगा.

**मा. सभापती :-**

किती क्लार्क पाहिजे?

**सन्याशिव :-**

तीन क्लार्क पाहिजे.

**मा. सभापती :-**

आठ दहा दिवसांत आम्ही तुम्हांला क्लार्क देतो.

**धनराज अग्रवाल :-**

तुम्हांला चावी मिळत नाही तर आपण दुसरी चावी बनवू शकत नाही का?

**सन्याशिव :-**

पंचनामा करावा लागतो.

**मा. सभापती :-**

तार करुन त्या कर्मचाऱ्याकडून कपाटाच्या चाव्या हस्तांतरित करुन घेण्यांत यावे.

**आक्षेप क्र. १ :-**

एकत्रित मालमत्ता कर विभागाबाबत. सन २००२-०३ करिता कर विभागाची चाचणी तपासणी केली. या विभागाचे कामाबाबत पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

**अ)**

**अशोक पाटील :-**

नियम ३ प्रमाणे पूर्ण वापरलेली पुस्तके विभागात परत केल्याच्या नोंदी घेतल्या नाहीत याचे स्पष्टीकरण करा.

**विजय पाटील :-**

संबंधित खात्याने सदर बाबतची पूर्तता केली आहे व अंतर्गत लेखा परिक्षकाने तपासून पुर्तता केली आहे.

**लिओ कोलासो :-**

सभागृहाला आपण सांगता की पुर्तता झाली आहे. पुर्तता केली त्याची तारीख काय आहे.

**विजय पाटील :-**

१५ एप्रिल नंतर पुर्तता करण्यांत आली.

**मिलन म्हात्रे :-**

वर्ष अखेर संपल्यानंतर केले आहे असे दिसते.

**प्रविण वैवुडे :-**

कर विभागाची पुस्तके संपल्यानंतर कर विभागाने ती पुस्तके सेंटर ऑफीसला परत केली पाहिजे असे आहे. त्यांनी ती पुस्तके मागवून घेतली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

जी पुस्तके घेतली त्याच्या नोंदी नाही तर ती पुस्तके घेतली कधी व दिली कधी.

**लिओ कोलासो :-**

आपण हे जे दिले आहे त्यावरुन ऑडीटर साहेब आपल्याला काय निर्दशनास आणून द्यायचे आहे.

**प्रविण वैवुडे :-**

मघाशी चौहाण साहेब बोलले की, अशा त्रुटी दाखविण्याचा अधिकार आहे का? तर ॲक्टमध्ये प्रोव्हिजन आहे. त्यामुळे मला रिपोर्ट देण्याचा अधिकार आहे. सदरच्या विषयाबाबत कर विभागाकडून पुस्तके आल्यानंतर विभागीय कार्यालयात पुस्तके दिली जातात. पुस्तके विभागात परत जमा झाली पाहिजे. ती जमा झालेली आहे व ती पुस्तके मी तपासली आहेत.

**मा. सभापती :-**

संबंधित विभागाला तुम्ही पत्र दिले काय?

**प्रविण वैवुडे :-**

मी स्वतः संबंधित प्रत्येक विभागाला पत्र दिले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब आपण हा रिपोर्ट कधी तयार केला.

**प्रविण वैवुडे :-**

मार्च महिना संपल्यानंतर मी हा रिपोर्ट तयार केला व मा. आयुक्त साहेब व मा. सभापती साहेब ह्यांना १२ एप्रिलला सादर केला.

**मिलन म्हात्रे :-**

जुनी पावती पुस्तके कधी मिळाली त्यांची तारीख सांगा.

**प्रविण वैवुडे :-**

०७/०५/२००३ला तपासली आहे आणि १५ जून नंतर आम्ही आमच्या ताब्यात घेतली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

गेल्या आर्थिक वर्षात किती पुस्तके वापरली.

**विजय पाटील :-**

सन २००२-०३ ला जेवढी पुस्तके वापरली आहेत ती आम्ही नमुना क्र. १ मध्ये घेतली आहे. ०७/०५/२००३ ला अंतर्गत लेखापरिक्षकाने प्रमाणित केले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्हाला मुळ पुस्तिकेत अर्धी कोरी मिळाली आहे का?

**मा. सभापती :-**

आपल्याला नेमके काय सांगायचे आहे.

**प्रविण वैवुडे :-**

भांडार विभागाने २० ते २५ पुस्तके लमसम द्यायचे असे असते. त्यांनी ती दिली आहे व त्याची पोच घेण्यांत आलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

पोच पावती कधी मिळाली.

**प्रविण वैवुडे :-**

जुनी वापरलेली पुस्तके संपल्यानंतर ती पुस्तके हेड ऑफिसला जमा करायला पाहिजे ती त्यांनी जमा केली नाही.

**लिओ कोलासो :-**

पहिल्या लॉटमध्ये त्यांनी जी पावती दिली आहे त्याची कार्यवाही पूर्ण करण्यांत आली आहे का?

**प्रविण वैवुडे :-**

होय. सर्व कार्यवाही पूर्ण करण्यांत आल्या आहेत.

**चंद्रकांत वैती :-**

आपण लेखासंहिताच्या नियमाप्रमाणे चालले पाहिजे. जी पुस्तके आपण देतो त्याची नोंद वेळीच झाली पाहिजे. ही लेखासंहिता आहे, त्याची अंमजबजावणी ही झालीच पाहिजे म्हणून आपण हा विषय घेतोय.

**मिलन म्हात्रे :-**

आपण हा विषय लाईटली घेऊ नका.

**मा. सभापती :-**

हा विषय आपण कुठे लाईटली घेतोय. लाईटली नको म्हणून हा विषय वेगळा घेण्यांत आला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आपण निर्णय द्या ना, ह्या खात्याने वेळीच पुस्तिका द्यावी.

**मा. सभापती :-**

वेळीच पुस्तिका देण्यांत यावी. ह्यापुढे अशी बाब येता कामा नये.

**अशोक पाटील :-**

सभापती साहेब ह्याच्यावर कंट्रोल कोण करणार.

**लिओ कोलासो :-**

ह्याच्यानंतर पुन्हा जी सभा येईल त्याच्यात आपण विषय घेऊ.

**प्रविण वैवुडे :-**

शनिवार, रविवार सुट्टीचे दिवस आहेत. कधी कधी शुक्रवारी संध्याकाळी पैसे येतात ते पैसे जमा करणे गरजेचे आहे. शक्य असेल तर संध्याकाळ बँकेत खाते उघडले तर चालेल का?

**लिओ कोलासो :-**

बँकेचे खाते उघडायला सरकारची परवानगी लागते का?

**प्रविण वैवुडे :-**

सरकारची परवानगी लागत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

स्टेट बँक सुट्टीच्या दिवशी देखील चालू असते. तसेच आय.सी.आय.सी.आय बँक आहे.

**शरद बेलवटे :-**

महानगरपालिकेचे खाते को-ऑपरेटीव्ह बँकेत खोलता येत नाही.

**चंद्रकांत वैती :-**

महानगरपालिकेच्या नियमांत राहून जिथे खाते उघडण्यांत येईल अशा बँकेत खाते उघडण्यांत यावे.

**मा. सभापती :-**

ज्या ठिकाणी संध्याकाळच्या बँक सोयी उपलब्ध आहेत तिथे खाते उघडण्यांत यावेत.

**शरद बेलवटे :-**

कॅश घेऊन जाण्यासाठी व्हॅनची आवश्यकता आहे.

**लिओ कोलासो :-**

कॅश पोहचवायला कॅश व्हॅनची आवश्यकता आहे. आपण हा विषय कन्सिडर करायला पाहिजे.

**हरेश गावंड :-**

आमची ह्या प्रस्तावाला शिफारस आहे.

**क)**

**विजय पाटील :-**

संध्याकाळच्या वेळेला कॅश उशिरा येते. ऑफीसची तिजोरी साडेसात वाजता बंद होत असते व त्याची चावी माझ्याकडे असते. ह्यापुढे एक चावी माझ्याकडे व दुसरी चावी लेखापाल ह्यांच्याकडे असेल.

**मा. सभापती :-**

अशी कार्यवाही तुम्ही लवकर करुन घ्या.

**ड)**

**विजय पाटील :-**

वाढ-घट नोंदवही ठेवली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

वाढ-घट नोंदवही म्हणजे काय?

**विजय पाटील :-**

सदनिकेचा टॅक्स कमी होतो किंवा वाढतो. त्या प्रत्येक सदनिकेची नोंद ठेवली जाते त्याला वाढ-घट नोंदवही असे म्हणतात.

**लिओ कोलासो :-**

मार्च महिन्याच्या शेवटला वाढ-घट नोंदवहीची स्थिती काय होती?

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही रजिस्टर ठेवले आहे का? तुम्ही सभागृहाला खोटी माहिती देत आहेत किंवा त्या नोंदवहीत नोंदी पडल्या नाहीत. जर नोंदी पडल्या असतील तर त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही. तुम्हांला मी किती प्रकरणे दाखवू. गेल्यावर्षी जे करदाते नागरिक आहेत त्यांनी महानगरपालिकेकडे रितसर अर्ज केला आहे. मी स्वतः साडेतीन हजार रुपये भरले आहेत. तुम्ही भरलेली रक्कम कुठे दाखवता अकाऊंटला. ती रक्कम परत दुसऱ्या वर्षी ॲड होऊन बिल येते. तुम्ही सांगता आम्ही रजिस्टर मेंन्टेन केले आहे. तुम्ही जर रजिस्टर व्यवस्थित मेन्टेन केले असते तर असे झाले नसते.

**दिनेश नलावडे :-**

टॅक्सबद्दल लोकांची नेहमी तक्रार असते आणि टॅक्स विभागाकडून हवे तसे समाधानकारक पुर्तता होत नाही. अशी किती तरी प्रकरणे आहेत. मी तुम्हांला पुराव्यासहित देऊ शकतो. टॅक्स भरुनही परत परत ती रक्कम ॲड करुन बिल पाठविले जाते. ह्या कामात सुधारणा झाली पाहिजे.

तसेच क्लार्क व्यवस्थित उत्तर देत नाही अशी स्थिती आहे. ज्यांच्याकडून चुक होत असेल त्यांना तुम्ही नोटीस द्या. अशी तक्रार पुन्हा आली तर तुमच्यावर कार्यवाही करण्यांत येईल.

**लिओ कोलासो :-**

तुम्ही त्या क्लार्कचे नांव सांगा.

**चंद्रकांत वैती :-**

महानगरपालिकेचे उत्पन्नाचे स्त्रोत घरपट्टी व पाणीपट्टी हे आहे. ह्या विभागातूनच महापालिकेला जास्त फायदा आहे. ऑडीटरची टिपणी आपणाजवळ आली आहे. त्यात सर्वांत जास्त ताशोरे किंवा चुक एकत्रित मालमत्ता कराबाबत आहे. दहापेक्षा जास्त विभाग येथे आहेत. पाणी विभाग, बांधकाम विभाग, आरोग्य विभाग. त्याच्यात ऑडीटरला खटकणा-या गोष्टी जास्त दिसतात. काल परवा आपली महासभा झाली. त्या सभेत खाजगी तत्वावर अभिकर्ता नेमण्याचा विषय आला होता. आपल्या विभागाकडून वसुली कमी होते. नऊ महिन्याच्या कालावधीमध्ये कुठल्या ना कुठल्या प्रकारे काही सदस्यांनी आपआपल्या सुचना केल्या आहेत. आयुक्त साहेबांनी सांगितले होते मे महिन्याच्या आत सगळी प्रकरणे हातावेगळी झाली पाहिजे. तरी ती प्रकरणे हातावेगळी झाली नाही. आपल्या घरपट्टीच्या वसुलीवर शासनाकडून आपल्याला साठ टक्के किंवा ऐशी टक्के अनुदान मिळणार होते. महाराष्ट्र शासनाचा निर्णय होता शंभर टक्के घ्यायचे तर आपली ऐशी टक्के वसुली व्हायला पाहिजे होती. आपल्याकडून घरपट्टी वसुली का होत नाही. विजय पाटील साहेब आपल्याला जर खरोखरच हे खाते त्रासदायक वाटते तर आपण त्या ठिकाणी खरोखरच सक्षम अधिकारी नेमावा. सभापती साहेब मी आपल्याला सांगतो आपण ह्या ठिकाणी स्पेशल अधिकारी नेमावा.

**मिलन म्हात्रे :-**

कामाचा त्रास होतो असे सांगणे योग्य नाही. टॅक्स खात्याचे कर्मचारी वर्कींग टाईममध्ये कॅन्टीनमध्ये, कुठे कुठे जाऊन बसतात. लोक त्यांच्याकडे काम घेऊन येतात म्हणून ही मंडळी खाली उतरतात. ह्यापुढे ऑन ड्युटी मध्ये मला कोणताही क्लार्क खाली सापडला तर मी त्याला पकडून आयुक्तांसमोर उभा करेन.

**मा. सभापती :-**

असे असेल तर तुम्ही त्या क्लार्कला आयुक्तांसमोर उभे करावे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

आपल्याला ही परिस्थिती सत्य वाटते का?

**मा. सभापती :-**

म्हणून तर बोलतो आपण अशा कर्मचा-यांना आयुक्तांसमोर उभे केले पाहिजे.

**अशोक पाटील :-**

आपल्याकडे किती क्लार्क आहेत.

**विजय पाटील :-**

त्रेपन्न क्लार्क आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

ऑडीटर साहेबांनी येथे सांगितले आहे की, एक कर्मचारी एकाच ठिकाणी अनेक वर्षापासून काम करत आहे. त्यांची बदली व्हायला पाहिजे. विजय पाटील साहेब खाते प्रमुख म्हणजे काय? आपण रिपोर्ट करायला पाहिजे.

**दिनेश नलावडे :-**

माझी अशी सुचना आहे सभापती साहेब, आपण प्रत्येक सोसायटीला पत्र दिले आहे आणि त्यांना टॅक्स हा फ्लॅटधारकाने भरायचे आहे. तुम्ही सोसायटीला कळवा कि, अमुक तारखेच्या आत भरणा हा झाला पाहिजे. तर ती सर्वस्वी जबाबदारी त्या सोसायटीची राहील आणि आपले वसुलीचे काम अतिशय चांगले होईल. आपण संबंधितांना अशा रितीने कामकाज करण्याचे आदेश द्यावेत.

**विजय पाटील :-**

संबंधितांना आदेश देण्यांत आलेले आहे. कर विभागाचा ठेका सन २००२-०३ मध्ये संपुष्टात येत आहे. खाजगी अभिकर्ता नेमणेबाबत हा विषय मा. महासभेत आला होता. पण मा. महासभेने हा विषय नाकारला आहे. तरी नविन अभिकर्ता घरपट्टीसाठी नेमायचा का? याबाबत आयुक्त साहेब बोलले, आपण ह्या विषयावर सोमवारी चर्चा करु.

**दिनेश नलावडे :-**

सोसायटीवाले आम्हांला बोलतात आपण आम्हांला लिस्ट द्या. आम्ही ते मेंन्टेनन्स मध्ये टाकून जमा करणार. आपल्याला सोसायटीवाले रक्कम जमा करुन द्यायला तयार आहेत.

**लिओ कोलासो :-**

हा जो करविभाग आहे तो महापालिकेचा सर्वाधिक उत्पन्नाचा भाग आहे. तुम्ही कर निरिक्षक आहात. हेड ऑफ द डिपार्टमेंट आहात. तर प्रत्येक काम जबाबदारीने करण्याची क्षमता तुमच्यात असायला पाहिजे. आता चंद्रकांत वैतीजी बोलले साठ टक्के कर वसुली झाली. ही वसुली जास्त व्हायला पाहिजे होती. तेव्हाच आपल्याला शासनाकडून अनुदान मिळणार आहे. ह्या विषयसंदर्भात मा. महासभेत प्रस्ताव आला होता. खाजगी अभिकर्ता नेमणे बाबत त्यावेळी वैतीजी आपणच सुरुवातीला उठून उभे राहिलात आणि सांगून टाकले की, आमचा ह्या विषयाला विरोध आहे. पण परिस्थिती अशी आहे, चाळीस टक्के वसुली होत नाही. त्या चाळीस टक्क्यांच्या वसुलीसाठी आपल्याला काहीतरी प्रयत्न करायला पाहिजे. स्टाफच्या अडचणी काय आहेत ते आपण बघायला पाहिजे. अजित पाटलांशी ज्या संबंधित गोष्टी आहेत त्या आपण बघायला पाहिजे. शिवमुर्ती नाईक साहेब हे आयुक्तपदी असतांना त्यांनी घोषणा केली होती लोकांना, आपण या आणि टॅक्स लावून घ्या. त्यामुळे लोक आले व त्यांनी टॅक्स भरले.

**मा. सभापती :-**

आपल्यासमोर असे चित्र उभे राहिले आहे की, आपल्याकडे स्टाफ कमी आहे. शंभर टक्के वसुली ही होऊ शकत नाही. संपूर्ण महानगरपालिकेचे उत्पन्नाचे स्त्रोत हे टॅक्स विभाग आहे. आपल्यासमोर ऑडीटरचा रिमार्क हा आला आहे. त्याच्यात कर विभागाबाबत जास्त रिमार्क आहेत, हे आढळून आले आहे. त्यांना ही लेखासंहिता पूर्ण करता येत नाही. त्यांना वेळ देता येत नाही. परस्पर अशा पद्धतीचे चित्र उभे राहिले आहे. प्रस्ताव आला होता हे खाते खाजगीकरण करायचे असे पण त्यावेळी मा. महासभेत असे बालले गेले की, जर आपण हे खाते खाजगीकरण केले तर त्या खात्याचे कर्मचारी हे काय काम करतील. पण त्यांच्या खात्याचे जे असेसमेंन्ट आहे ते तर त्यांना करायचेच आहे. जकात खाजगीकरण आणि टॅक्स खाजगीकरण हे दोन्ही वेगळे आहे. टॅक्स वसुलीवर आपलेच नियंत्रण राहणार होते. पण ठिक आहे, ह्यापुढे अशा ज्या क्वे-या आहेत त्या पूर्ण केल्या पाहिजे व ह्याच्यापुढे ह्या विभागात असे रिमार्क येता कामा नये.

**विजय पाटील :-**

पुर्वीच्या नगरपालिका काळात ब-याच शैक्षणिक संस्थांना करात पन्नास टक्के सुट दिलेली आहे असे नमूद केले आहे पण तशी सुट देण्यांत आलेली नाही.

**प्रविण वैवुडे :-**

बजेटची चर्चा झाली त्यावेळी महानगरपालिका झाल्यानंतर बजेटची नोंद वही आहे ती बजेटच्या चर्चेच्या वेळी सभागृहाला दाखवायला पाहिजे होती. ती दाखविण्यांत आली नाही असा मुद्दा आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ह्याच्यावर सभापती साहेब आपला निर्णय काय?

**मा. सभापती :-**

नोंदी दाखविण्यांत येईल.

**लिओ कोलासो :-**

पुढच्या बजेटच्या वेळी दाखविण्यांत यावी. कारण आताचा बजेट हा मंजूर झाला आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

न दाखविल्यामुळे काय परिणाम होणार आहे. ते आपण सांगा.

**प्रविण वैवुडे :-**

दाखवायला पाहिजे.

**इ)**

**लिओ कोलासो :-**

शासनाकडून जे अनुदान मिळणार आहे ते मिळत नाही का?

**अशोक पाटील :-**

वसुली होत नाही त्याचे काय?

**विजय पाटील :-**

जेवढे कर निरिक्षक आहेत त्यांच्याकडे क्षेत्रीय अधिका-यांचे काम दिले आहे. फक्त घरपट्टीकडे त्यांना खास असे लक्ष देता येत नाही. त्यांचे पाच-पाच दिवस, सहा-सहा दिवस हा अतिक्रमण काढण्यामध्येच त्यांचा वेळ जातो.

**मिलन म्हात्रे :-**

तुमचे स्टेटस येथे डाऊन करायचे म्हणून मी बोलत नाही. पण सत्य परिस्थिती अशी आहे की, आपला कर्मचारी हा त्याचे काम दिड तासात संपवून तो परत घरी जातो. मी स्वतः ही गोष्ट नोट

केली आहे. अतिक्रमण तोडायला आलेल्या अधिकाऱ्यांची वेळ नोट डाऊन केले होते. सकाळचे अतिक्रमण हटवायचे असेल तर ते काम एक ते दिड तासाचे असते. त्याच्यानंतर त्यांनी ते काम आटपून बारा साडेबारा वाजता कार्यालयात यायला पाहिजे आणि त्यांच्या पुढच्या कामाला सुरुवात केली पाहिजे. पण तसे होत नाही. माझ्याकडे प्रमाण आहे. आपण वेळेचे रजिस्टर मेन्टेन करा. त्यावरुन आपल्याला कोण किती वाजता आले आणि कामाला सुरुवात केली व काम कधी संपले त्यांची बरोबर माहिती मिळेल.

**लिओ कोलासो :-**

स्टाफच्या कार्यक्षमतेवर आपले परिपूर्ण लक्ष पाहिजे.

**चंद्रकांत वैती :-**

अतिक्रमण हटविण्यासाठी किती स्टाफ वापरला जातो.

**केसरीनाथ म्हात्रे :-**

क्षेत्रिय अधिकारी आठ आहेत. तसेच ज्या विभागाची तक्रार असते त्या विभागाचा क्षेत्रीय अधिकारी तिथे उपस्थित असतो.

**विजय पाटील :-**

कर निरिक्षकांनी पत्र दिले आहे. आमच्याकडे अतिक्रमण विभागाचा जो चार्ज दिला आहे. तो चार्ज काढून घ्यावा व फक्त घरपट्टीचा चार्ज द्यावा.

**अशोक पाटील :-**

जे कर निरिक्षक आम्हांला चार्ज नको असे बोलतात तर शहरात अतिक्रमण होत नाही का? झोपडपट्ट्या वाढत नाही का? त्यांना कामकाज करायला नको का?

**विजय पाटील :-**

त्यांच्याकडे जो अतिरिक्त चार्ज आहे तो त्यांना नकोय.

**अशोक पाटील :-**

क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी तुमच्याकडे अशी माहिती दिली आहे का? अतिक्रमण खाते आम्हांला नको कारण ह्या वार्डमध्ये अनधिकृत बांधकाम होत नाही असे आहे का?

**चंद्रकांत वैती :-**

ते एकटेच एकमेव काम करत आहे असे नाही.

**विजय पाटील :-**

गेल्या वर्षी ज्या निवडणूका झाल्या त्याच्यानंतर सप्टेंबर, ऑगस्ट महिन्यापर्यंत निवडणूकीचेच काम चालू होते. त्याच्यानंतर बिले निघाली आणि ही साठ टक्के वसुलीचे काम केले आहे. ते जानेवारी महिन्यापासून केले आहे.

**लिओ कोलासो :-**

साठ टक्के बरोबर चाळीस टक्क्याची देखील वसुली व्हायला पाहिजे होती.

**विजय पाटील :-**

मुख्य म्हणजे आम्हांला लिपीक वर्गाची आवश्यकता आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मागच्या वेळी जी वसुली झाली ती फार वाईट परिस्थिती मध्ये झाली होती, तरी वसुली ही चांगली झाली. त्यावेळी शहरामध्ये रोड वायडिंग झाले होते. आपण हे सगळे करत असतांना बाहेरुन स्टाफ मागविला नाही किंवा ठेका पद्धतीने घेतला नाही. केस झाले कोर्ट मॅटर झाले तरी सुद्धा आपली वसुली ही चांगली झाली आहे आणि आता हे सर्व नसतांना देखील आपली वसुली एवढी कमी आहे.

**मा. सभापती :-**

पंच्याहत्तर ते ऐंशी टक्के वसुली व्हायला पाहिजे.

**विजय पाटील :-**

सत्तर टक्के वसुलीची मी आपल्याला गॅरंटी देतो.

**चंद्रकांत वैती :-**

मध्यंतरी कमिशनर साहेब नगरभवनामध्ये जात होते. त्यावेळी ते मुख्य कार्यालयात नसतांना दुसरे अधिकारी देखील वेळेवर त्यांच्या स्वतःच्या कॅबिनमध्ये मिळत नव्हते. टॅक्स विभागाचा चार्ज कुणाकडे आहे. नाईक साहेबांकडे आहे का? त्यांना साईन ऑथोरिटी आहे का?

**विजय पाटील :-**

नाईक साहेबांकडेच चार्ज आहे व त्यांना साईन ऑथोरिटी आहे.

**मा. सभापती :-**

स्टाफ कडून वसुली होत नसेल तर आपल्याला दुसरा पर्याय शोधायला पाहिजे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

माझे टॅक्सबाबत नाईक सो. बरोबर बोलणे झाले त्यावेळी ते म्हणाले होते की, टॅक्सची वसुली माझ्याकडे नाही. जर माझ्याकडे वसुली असती तर चांगली वसुली करुन दाखविली असती.

**विजय पाटील :-**

टॅक्स विभागाचा चार्ज हा नाईक सो. यांचेकडेच आहे. हवे असल्यांस आपण सचिवांना विचारा.

**मा. सभापती :-**

आपण जर असे ठामपणे बोलता की, नाईक सो. कडे वसुलीचा चार्ज नाही व विजय पाटील सभागृहाला माहिती देत आहेत की, नाईक साहेबांकडे चार्ज आहे. जर ते सभागृहाला खोटी माहिती देत असतील तर त्यांच्यावर आपल्याला कार्यवाही करावी लागेल.

**लिओ कोलासो :-**

आपण सचिवांना विचारा ना.

**प्र. सचिव :-**

नाईक साहेबांकडे वसुलीचा चार्ज आहे.

**मा. सभापती :-**

पुर्वी नाईक सो.कडे जास्त खाती होते. तेव्हा त्यांची वसुली ही ऐंशी टक्के झालेली आहे आणि आता पुर्वी पेक्षा कमी खाती आहेत तरी वसुलीत एवढा फरक आलेला दिसत आहे. विजय पाटील बोलतात सत्तर टक्के वसुली होईल. त्याच्यावर आम्ही करु शकत नाही तर सत्तर टक्के वसुली ही आम्हांला अपेक्षित नाही हा मुद्दा आहे.

**धनराज अग्रवाल :-**

विजय पाटील सो. आपण वसुली कमी कशाला बोलता. मघाशी आपण पंच्याहत्तर टक्के वसुली करु शकतो असे बोलतात.

**चंद्रकांत वैती :-**

तुम्ही आपल्या कामकाजात अक्षमता दाखविता म्हणजे अभिकर्ता नेमणेबाबत आपला हात आहे असे समजायचे का?

**धनराज अग्रवाल :-**

पंच्याहत्तर टक्यावरुन तुम्ही सत्तर टक्क्यांवर कसे आलात ते सांगा.

**मा. सभापती :-**

विजय पाटील ऐंशी टक्के वसुली तुमच्याकडून झाली पाहिजे.

**विजय पाटील :-**

प्रशासनाला वसुली व्यवस्थित करायची असेल तर मनुष्यबळ पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

नविन भरती करण्यांत आलेली आहे ना ते कधीपासून कामावर येतील.

**लिओ कोलासो :-**

त्यांचे जातीचे दाखले पडताळणीसाठी गेले आहे. जसजसे त्यांचे प्रमाणपत्र टॅली होतील तसतशी भरती होईल.

**मा. सभापती :-**

तुम्हांला पुरेसा स्टाफ मिळण्यासाठी आम्ही शिफारस करु व ऐंशी टक्के वसुलीही कर विभागाकडून अपेक्षित धरतो.

**ई)**

**मिलन म्हात्रे :-**

हे जे दिले आहे (ई) मध्ये उक्त तपासणी केल्याबद्दल प्रमाणपत्र नमूद करण्याची व्यवस्था कराधिन विभागाने करावी. चेकच्या काही पावत्यांवर वसुली लिपीकाच्या सह्या नाहीत. अशा प्रकारांमुळे सर्व लिपीक व मान्य करणारे नगरसेवक यांच्यावर केस होऊ शकते. अशा प्रकारची केस कोर्टामध्ये चालू आहे. विजय पाटील यांनी पावती फाडली आणि त्या पावतीवर त्यांची सही नाही तर ती पावती अनव्हॅलिड ठरते किंवा पेन्सिलने, कार्बन सही असेल तरीही ती अनव्हॅलिड ठरते. एक छोटीशी सही न केल्यामुळे त्या माणसाला किती अडचणींना तोंड द्यावे लागते.

**लिओ कोलासो :-**

अशा स्वरुपाच्या किती पावत्या आहेत व आपल्या निदर्शनास किती पावत्या आल्या आहेत. आपण एवढे कनिष्ठ पद्धतीने प्रशासन चालवतो का?

**विजय पाटील :-**

मार्च महिन्यामध्ये वसुलीचे प्रमाण वाढलेले असते त्या महिन्यामध्येच असे होते. एका एका सोसायटीच्या शंभर ते एकशे पन्नास इतक्याच्या पावत्या असतात त्यामुळे प्रत्येक पावतीवर सही होत नाही.

**चंद्रकांत वैती :-**

(ई मधील दुसरा मुद्दा वाचला) अशी खाडाखोड होते ती खाडाखोड का होते? नगरपालिका असतांना १२ जून, १९८५ पासून दहा करोड ऑडीट डिफरन्स होता. ते पैसे कुठे होते, कुठे नव्हते ते भासवतांना त्या अधिकाऱ्यांना किती आटापिटा करावा लागला. त्यावेळी भ्रष्टाचार झाला असे सांगितले. पण आता आपण ह्या गोष्टीवर दक्षता का घेऊ नये.

**तुळशीदास म्हात्रे :-**

अशा अधिकाऱ्यांवर तुम्ही काय निर्णय घेणार आहात.

**लिओ कोलासो :-**

सह्या झाल्या पाहिजे. जर सह्या होत नसतील तर आपण त्या कर्मचाऱ्यांवर कार्यवाही व्हायला पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

असा जी.आर. आहे अशी चुक केली तरी त्याची जिम्मेदारी ही कर निरिक्षकावर असते. तुम्हांला स्टाफ वाढवून पाहिजे व तो वाढवूनही दिला पण ते पाहण्याचे काम हे एकट्या विजय पाटलांचेच आहे ना? स्टाफ कमी आहे असे बोलून कसं चालायचं.

**अशोक पाटील :-**

तुम्हांला काय टेंन्शन असेल तर तसे तुम्ही सांगा.

**मा. सभापती :-**

साठ ते सत्तर टक्के वसुली मान्य केली आहे. आपल्या कामात चोखपणा पाहिजे. कामात नियमितपणा पाहिजे. आपल्या कामात सुसूत्रता दिसून येत नाही त्यामुळे तुम्हांला आणि तुमच्या स्टाफला ताशोरे दिले जाते.

**मिलन म्हात्रे :-**

पहिले सुट्टीच्या दिवसात क्लार्क कामाला आलेले दिसायचे पण आता तसे दिसत नाही.

**अशोक पाटील :-**

स्टाफ कमी आहे हे एकच सबळ कारण आहे का तुमच्याकडे? तुम्ही तुमच्या कर्मचाऱ्यांना विचारा, तुम्हांला काय अडचण आहे ते व ती अडचण आवश्यक असेल तर आमच्यासमोर मांडा अन्यथा तुम्ही त्या अडचणींवर मात करा.

**प्रविण वैवुडे :-**

विजय पाटील ह्यांना संपूर्णतः दोषी ठरवता येणार नाही कारण निरिक्षकांचाही दोष आहे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

आपण कशाला ह्याच्यावर उत्तर देता. उत्तर विजय पाटीलांना देऊ देत.

**विजय पाटील :-**

तीस टक्के फ्लॅट हे बदं आहेत. त्यामुळे आम्हांला प्रत्येक वर्षी तीच कार्यवाही करावी लागते.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्हांला लिलाव करायला सांगितले होते. त्यावेळी तुम्ही लिलाव केला का?

**अशोक पाटील :-**

तुम्ही तुमच्या वरिष्ठांच्या निदर्शनास ही बाब आणली आहे का?

**विजय पाटील :-**

ज्या पावत्यांवर सह्या नाहीत त्याच्यावर ही क्वेरी काढण्यांत आलेली आहे. ३१ मार्च पर्यंतच्या ह्या पावत्या पुस्तिका आहेत ह्यावर कार्यवाही करण्यांत येईल.

**मिलन म्हात्रे :-**

हे जे तीन ऑडीट दाखविले आहे. १६/०९/२००२, १८/११/२००२, २८/११/२००२, ०३/१२/२००३, पावती क्र. ४२२०, ४१००, ३८००, ६३०५ ही जी जमा रक्कम आहे ती जवळ जवळ आपण किती महिने वापरले ते आपण बघा. कालावधी एवढा का? प्रश्न तीनशे ऐंशी रुपयांचा नाही.

**लिओ कोलासो :-**

ही पुस्तके तपासली आहे का?

**प्रविण वैवुडे :-**

संबंधितांकडून जेव्हा एवढा फरक आला त्यावेळी ती पुस्तके तपासण्यांत आलेली आहे व संबंधितांना नोटीस देण्यांत आली आहे.

**चंद्रकांत वैती :-**

कर निरिक्षक/अधिक्षक/कर निर्धारक संकलक यांच्याशी चर्चा केल्यानंतर संबंधितांनी अ.क्र. १ व २ च्या रक्कमा महानगरपालिका फंडात जमा केल्या आहेत. अ.क्र. ३ चे बाबत रु. २९०/- कमी जमा रक्कम कर्मचारी श्रीम. रश्मी चव्हाण यांचेकडून पा.क्र. २४१३६३, दि. ०६/०५/२००३ रोजी वसुल करुन महानगरपालिका फंडात जमा केले आहे. तर अशी पावतीने वसुली करता येते का?

**प्रविण वैवुडे :-**

वसुली दोन्ही प्रकारे करता येते.

**चंद्रकांत वैती :-**

कार्यवाही करण्यांत येणार का? वसुली करण्यांत येणार असे काय आहे.

**प्रविण वैवुडे :-**

वसुली करण्यांत येणार.

**फ)**

**मिलन म्हात्रे :-**

प्रत्येक फॉर्मवर पावतीचा नंबर व्यवस्थित लिहिलेला असतो. मग एवढे सर्व क्लिअर असतांना असे होते?

**विजय पाटील :-**

एकूण फॉर्म किती विकले गेले आहेत त्याचा हिशोब आम्ही व्यवस्थित केला आहे.

**प्रविण वैवुडे :-**

त्यांनी तेव्हा हिशोब केला नव्हता नंतर हिशोब केला.

**च)**

**मा. सभापती :-**

सेक्शन दहा नुसार तुम्ही कार्यवाही करा.

**भ)**

**मिलन म्हात्रे :-**

जे क्लार्क तुमच्या डिपार्टमेंटमध्ये काम बरोबर करत नाही असे तुम्हांला वाटते त्यांची तुम्ही बदली करा.

**मा. सभापती :-**

आस्थापनाचे रिपार्ट आणा. एकच कर्मचारी एक ठिकाणी पाच-पाच वर्ष काम करतो असे नमुद आहे. तुम्ही त्यांच्या बदल्या करा. ह्याबाबत आस्थापनाने पुढच्या सभेत अहवाल घेऊन यावा.

**चंद्रकांत वैती :-**

कामावर येत नाही आणि रजिस्टरवर सह्या करुन जातात व महिन्याभराचा पगार घेतात. त्यांच्यावर आपण काय कार्यवाही करता.

**मा. सभापती :-**

प्रत्येक विभागाची माहिती आपण आणावी.

**लिओ कोलासो :-**

आस्थापनाने ह्याच्यावर स्पष्ट स्टेटमेंट दिले पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब मला ह्या विषयावर बोलायचे आहे. आपल्याकडे सफाई कामगार म्हणून किती महिला कामावर आहेत. आपण त्याची तपासणी करा. कारण ते येथे हजेरी लावून प्रायव्हेट सोसायटीमध्येच जाऊन काम करताहेत.

**मा. सभापती :-**

आस्थापना ह्याबाबत अहवाल सादर करावा.

**म)**

**धनराज अग्रवाल :-**

गाळेबाबत दर ठरवायची जबाबदारी कुणाची आहे.

**लिओ कोलासो :-**

ऑटोमॅटिकली सर्व जबाबदारी ही हेड ऑफीस प्रशासनावर येते.

**मा. सभापती :-**

ह्याचा स्वतंत्र विभाग आहे का?

**प्र. सचिव :-**

सामान्य प्रशासनाकउे सदरचे कामकाज पाहिले जाते.

**धनराज अग्रवाल :-**

वीस वर्षापासून आपण तेच भाडे घेतलेले आहे. त्याचा काही एक रिपोर्ट दिलेला नाही.

**विजय पाटील :-**

एक वर्षापूर्वी माझ्याकडे सामान्य प्रशासन आले.

**धनराज अग्रवाल :-**

त्याच्या आधी कुणाकडे खाते होते?

**मा. सभापती :-**

रमेश म्हात्रे ह्यांच्याकडे होते.

**धनराज अग्रवाल :-**

ह्या कामासाठी अधिकारी नव्हता असे तुम्ही लिहून द्या.

**मा. सभापती :-**

पुढच्या वेळेला याबाबत माहिती देण्यांत येईल.

**आक्षेप क्र. २ :-**

पाणी पुरवठा आणि कर विभाग.

**अ)**

**लिओ कोलासो :-**

पाणी पुरवठा खात्याने अठ्याऐशी टक्के वसुली केली ती समाधानकारक गोष्ट आहे. सध्या पाणी पुरवठ्यात वाढ झालेली आहे. त्यानुसार स्टेमच्या पाणी बिलाचा विचार करुन वसुलीत वाढ होणे आवश्यक आहे असे टिपणीत आहे. मोठे काम करत असतांना असे श्रेय देणे अपेक्षित असते. त्यांनी काय काम केले त्याचा अहवाल आपण मला द्यावा.

**दशोरे :-**

फायनानशियल वर्ष २००२-०३ ची वसुली समाधानकारक आहे.

**प्रविण वैवुडे :-**

त्यांना केलेल्या कामाची पुर्तता करायला सांगितले.

**दशोरे :-**

मी पुर्तता करायला सुरुवात केली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मागे प्रकरण घडले जुने बेचाळीस त्याचे काय झाले.

**लिओ कोलासो :-**

ते ह्या चर्चेमध्ये कसे येईल.

**मिलन म्हात्रे :-**

एखाद्या कनेक्शनचे अकाऊंट तुम्ही स्टार्ट टू एन्ड घेता ना. तर बेचाळीस नंबर हा कंन्टीन्यु चालू राहतो ना साहेब. रजिस्टर नंबर दिले जाते त्याच्यात जी कनेक्शन आहे. ती कनेक्शन घेऊन बिले आकारणी केली जाते ना.

**लिओ कोलासो :-**

ऑडीटर साहेब आपण स्पष्टीकरण द्या ना.

**मिलन म्हात्रे :-**

एकूण किती खाते आहे ते आपण आम्हांला सांगा.

**प्रविण वैवुडे :-**

बेचाळीस नंबरच महासभेने निर्णय दिलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आपण आम्हांला सांगा आपण त्या लोकांना देखील बिले पाठवितो ना.

**मा. सभापती :-**

सदरच्या विषयाबाबत मा. महासभेत निर्णय देण्यांत आलेला नाही. तर आता आपण येथे काय निर्णय देणार.

**दशोरे :-**

आता आम्ही झोनप्रमाणे सर्व बदल केला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

बेचाळीस नंबरची आपण बिले घेता का नाही.

**पहुरकर :-**

बेचाळीस नंबरप्रमाणे बिले घेतली जात नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्या अकाऊंटमध्ये रक्कम निघाली आहे.

**लिओ कोलासो :-**

आपण गृहित धरतो ते इलिगल रजिस्टर होते.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही काही रजिस्टरमध्ये बिल अधिकृत देवून लावले आहे.

**लिओ कोलासो :-**

म्हणून हा विषय अत्यंत डेलीकेट आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ऑडीटर साहेबांचे काय म्हणणे आहे.

**प्रविण वैवुडे :-**

सदरच्या विषयाबाबत मा. महासभेने निर्णय दिला नाही तर मी काय सांगू.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब तुम्ही ह्याच्यावर निर्णय असा घ्या की, बँकेच्या ज्या नोंदी आहेत त्या तपासून घ्या व आपल्या पुस्तकांत नोंदी करुन घ्या. कारण त्याचे बिलाची रक्कम आजही तुमच्याकडे येत आहे. बेचाळीस नंबरमध्ये एकही अधिकृत नळ कनेक्शन नव्हते का? हे बेचाळीस नंबर ओपन केले तर काही पदाधिकारी व कर्मचारी अडचणीत येणार आहे. प्रश्न एवढे बोलून संपणार नाही. बेचाळीस नंबरमध्ये अधिकृत कनेक्शन होत का नव्हते. त्याची वसुली आपण आजही टील टुडे करतो आहे.

**मा. सभापती :-**

ह्या विषयला रुलिंग देऊच शकत नाही आणि हा विषय ह्या ऑडीटमध्ये येणारही नाही.

**मिलन म्हात्रे :-**

प्रश्न फार पुर्वीचा नाही.

**लिओ कोलासो :-**

ह्याच्यावर तरणोपाय असा आहे की, जे अधिकृत आहे त्याची तुम्ही छाननी करा व नोंद घ्या व त्याच्यावर एक सविस्तर टिपणी द्या.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही ह्याच्यावर काय रुलिंग देणार आहात.

**मा. सभापती :-**

नोंद वही ठेवली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

नोंद वही कधी ठेवली.

**दशोरे :-**

एक एप्रिलपासून नोंदवही ठेवली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

बिले जाणार आहे ती त्या नंबरने देणार आहे का?

**दशोरे :-**

एप्रिल, मे, जून पासून बिल देणार आहे. जवळ जवळ ऐशी टक्के बिले गेली आहेत व वीस टक्के बिलाचे काम राहिले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

स्वाक्षऱ्या नाही त्याचे काय?

**दशोरे :-**

नोंद वहीत मीटर रिडरची सही घेत होतो. ह्या वर्षापासून लिपीक आणि मुख्य लिपीक ह्यांची सही नोंद वहीत घेणार आहोत.

**चंद्रकांत वैती :-**

अशाच प्रकारामुळे ठाणे महानगरपालिकेमध्ये कर्मचाऱ्यांवर कार्यवाही झालेली आहे ते तुम्हांला माहित आहे ना?

**प्रविण वैवुडे :-**

महानगरपालिका झाल्यापासून मी ऑडीट चेक केले आहे ते व्यवस्थित आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आपण जे इलिगल कनेक्शन लिगल केले तेव्हा भुतकाळातील रक्कम घेतली आहे. ती रक्कम आता वाढली आहे. गेल्या एप्रिल महिन्यापासून बिलाची रक्कम अडकलेली आहे.

**दशोरे :-**

सप्टेंबर २००१ पासून आता पर्यंतची ३१ मार्च पर्यंतची ऐंशी टक्के बिले आम्ही पाठवून दिली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ही जी बिले आहे त्याचा उल्लेख आहे. त्याच्यात एक रक्कम आपल्या चुकींमुळे जाणार आहे. ह्याच्यामध्ये आपण काय करतोय का? कारण चुक आपली आहे.

**ब)**

**क)**

**ड)** नविन नळ कनेक्शनच्या वसुलीबाबत.

**अशोक पाटील :-**

नक्की काय गंभीर बाब आहे त्याचा आपण खुलासा करा.

**प्रविण वैवुडे :-**

चेकने किंवा डी.डी. ने रक्कम घ्यायचे असे आहे पण संबंधित रक्कम जमा झाल्यानंतर चलनाने लेखा शाखेकडे आली नाही. त्यामुळे रिकन्सीलेशनला प्रॉब्लेम येऊ नये म्हणून दाखविण्यांत आले आहे.

**मा. सभापती :-**

ह्याच्यापुढे अशा कामात तुम्ही दिरंगाई करु नका. लवकरात लवकर तुम्ही काम करुन घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

आपण डिमांन्ड नोट अजून काढली नाही, त्यामुळे त्यांच्याकडे डिमांन्ड नोट व पावती ही नसते.

**दशोरे :-**

आम्ही आत डिमान्ड नोट देतो.

**इ)**

**मा. सभापती :-**

शासन निर्णय काय.

**दशोरे :-**

आतापर्यंत अनामत रजिस्टर आहे ते भांडारपालकडून मिळाले नाही.

**लिओ कोलासो :-**

भांडारपालने अनामत रजिस्टर का दिले नाही?

**गोखले :-**

छापायला दिले आहे.

**अशोक पाटील :-**

अनधिकृत नळ संयोजने अधिकृत करण्याची कार्यवाही चालू आहे का?

**मा. सभापती :-**

होय कार्यवाही चालू आहे.

**आक्षेप क्र. ३ :-**

आस्थापना विभागाबाबत.

**लिओ कोलासो :-**

वेतनवाढीची अशी किती प्रकरणे आहेत.

**श्रीकांत मोरे :-**

लेखी माहिती घेऊन माहिती देतो.

**अशोक पाटील :-**

ग्रामपंचायत काळापासून कर्मचारी आहे. त्यांचा अनुशेष भरलेला नाही त्याचे काय? आणि सेवाजेष्ठता यादीमध्ये कुठे समावेश का घेतला नाही.

**गोविंद परब :-**

ओ.बी.सी. अनुशेष ओव्हर भरला गेला आहे.

**अशोक पाटील :-**

त्यांची सेवाजेष्ठता कधी पासून भरली आहे.

**गोविंद परब :-**

अनुशेष आणि सेवाजेष्ठता हे दोन्ही विषय वेगळे आहेत.

**श्रीकांत मोरे :-**

सेवा जेष्ठता बाबत लेखी झाले व त्याप्रमाण कार्यवाही करणार आहे.

**आक्षेप क्र. ५ :-**

भविष्य निर्वाह निधी.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

हे काय बरोबर रेग्युलर झाले पाहिजे.

**प्रविण वैवुडे :-**

भविष्य निर्वाह निधीच्या दैनिक पुस्तकानुसार येणारी अखेरची शिल्लक व भविष्य निर्वाह निधीच्या कॅश बुक / बँक बुकानुसार येणारी शिल्लक यात तफावत आहे. म्हणून हा मुद्दा येथे मांडला आहे.

**लिओ कोलासो :-**

आपण बऱ्याचशा कर्मचाऱ्यांकरिता म्हणता आणि परब आपण ते रिफ्युज करता.

**गोविंद परब :-**

रक्कम कमी असेल तर पन्नास टक्क्यापेक्षा जास्त देता येत नाही.

**लिओ कोलासो :-**

सर्व कर्मचाऱ्यांना तुम्ही वागणूक चांगल्या पद्धतीने दिली पाहिजे.

**मा. सभापती :-**

वरिष्ठ लिपीक आपण त्यांना द्यायचे आहे.

**आक्षेप क्र. ६ :-**

बांधकाम विभागाबाबत.

**दिपक खांबीत :-**

मालमत्ता दर्शविणारे विवरणपत्र व नोंदवही तयार करुन दाखविणे आहे.

**प्रविण वैवुडे :-**

काल दाखविण्यांत आले आहे.

**चंद्रकांत वैती :-**

सन २००२-०३ या वित्तीय वर्षात बांधकामाच्या नोंदी विभागाने बांधकाम नोंदवह्यांत घेतल्या आहेत. वर्षअखेर पूर्ण झालेली बांधकामे, अपूर्ण असलेले व पुढील वर्षात करावयाची किती कामे याचे विवरणपत्र तयार करुन वरिष्ठांकडे सादर करावे तर तसे सादर करण्यांत आलेले आहे का?

**दिपक खांबीत :-**

प्रत्येक काम हे स्थायी समितीसमोर आणले आहे.

**चंद्रकांत वैती :-**

स्ट्रीट लाईटबद्दल अजून सर्व नगरसेवक असमाधानकारक आहे.

**अशोक पाटील :-**

ही स्ट्रीट लाईट बंद आहे असा अहवाल कर्मचारी तुम्हांला देतात का?

**लिओ कोलासो :-**

आमच्या विभागाच्या स्ट्रीट लाईट बंद आहेत.

**दिपक खांबीत :-**

स्ट्रीट लाईट बंद असते व बिल आले आहे तर आम्ही ते बील कपात करुन घेतले आहे. मे महिन्यात वीस हजार रुपये कपात केले आहे.

**चंद्रकांत वैती् :-**

सदरच्या विषयात क्र. क मध्ये ठेकेदारांची बिले प्रदानासाठी प्रलंबित राहतात. ते अकाऊंटच्या दृष्टीकोनातून चांगले नाही.

**प्रविण वैवुडे :-**

प्रत्येक वर्षी जो फरक वाढत आहे त्याच्यासाठी कंट्रोल करायचे व रजिस्टर ठेवायचे.

**चंद्रकांत वैती :-**

(ड) मध्ये लेखा संहिता नियम १५६ नुसार बांधकाम विभाग प्रमुख यांनी स्थावर मालमत्तेची नोंदवही वार्षिक पडताळणीकरिता सादर केलेले आहे.

**दिपक खांबीत :-**

पडताळणीकरिता उशिरा सादर केले आहे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मेरा एक मुद्दा है की, ठेकेदार को कोई भी काम देते है। तो वो ठेकेदार एरिया का मोजमाप का काम अपने पास होत है क्या? रजिस्टर बनता है क्या?

**दिपक खांबीत :-**

रजिस्टर बनता है।

**तुळशीदास म्हात्रे :-**

जे रस्त्यावर लाईटचे खांबे आहेत ते शिफ्ट होणार काय?

**मिलन म्हात्रे :-**

काशीमिरा मेन राडवर फाटक जवळ लाईट अजून पर्यंत बंद आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

फाटक पासून गोल्डन नेस्ट पर्यंत लाईटच्या खांब्याची आवश्यकता आहे पण तिथे अजून खांबे टाकलेले नाही.

**मा. सभापती :-**

सदरचे काम करुन घेण्यांत यावे.

**दिपक खांबीत :-**

साहेब तिथला रस्ता झाल्यावरच काम करता येईल?

**मा. सभापती :-**

रस्ता झाल्यावर सदरचे कामकाज करुन घ्यावे.

**आक्षेप क्र. ७ :-**

नगरपरिषद वाचनालय.

**मिलन म्हात्रे :-**

अनामत रक्कम घ्यायचे आहे का? ना नफा ना तोटा या तत्वावर वाचनालय सेवा ठेवणे सोयीचे होईल असे नमूद आहे तर आपण असा ठराव करुन सभेसमोर घेऊन या व आपल्याकडे जे पुस्तके आहेत त्याचा स्टॉक वाढवा.

**मा. सभापती :-**

पुस्तकांचा स्टॉक वाढवून घेण्यांत यावा.

**आक्षेप क्र. ८ :-**

आरोग्य विभागाबाबत.

**प्रविण वैवुडे :-**

जी वाहने होती त्याची सामुग्रीबाबत घसारा वजा जाता त्याची सध्या किती मत्ता आहे याचे विवरणपत्र काढले नव्हते.

**लिओ कोलासो :-**

आरोग्याचा खर्च कमी करण्यासाठी उपाययोजना करणे जरुरीचे आहे हा जो मुद्दा आहे तो मुद्दा नक्की कुणाशी निगडीत आहे त्याचे आऊटपुट काय आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

आझाद नगरला साफ सफाई करायला कोण येतच नाही.

**मिलन म्हात्रे :-**

काशीमिरा रोडच्या येथे ज्या साईड आहेत तिथे पाणी तुडूंब भरलेले आहे आणि मेन रोडवर जे मोठे गटार आहे तिथले सगळे पाणी हे ओवर फ्लो होते आणि रस्त्यावर येते.

**तुळशीदास म्हात्रे :-**

काशीमिरा रोड कोण बघतो त्यांनी रिपोर्ट केला नाही का?

**दिपक खांबीत :-**

तिथे उघाडी बंद होती त्यामुळे पाणी ओवर फ्लो झाले होते. पण तिथे पाईप टाकून ती उघाडी चालू केली आणि आता तेथून पाणी निघून गेले आहे. मी ह्या कामाकरिता रात्री अकरा ते सकाळी सात वाजेपर्यंत तेथेच होतो.

**मिलन म्हात्रे :-**

हीच परिस्थिती आर.ओ.बी.च्या रोडची आहे. कित्येकदा पाईप टाका म्हणून सांगून झाले आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

कचरा रस्त्यावर आला आहे. तो साफ करायला सांगा. तुम्ही ज्या कर्मचाऱ्यांना ह्या कामावर ठेवले आहे. त्यांना तुम्ही विचारा कचरा काढला का नाही काढला असे.

**मिलन म्हात्रे :-**

पाईप लाईनचे काम झाले आहे. पाईप लाईन पडले का नाही पडले.

**मा. सभापती :-**

पाईप लाईन टाकण्यांत आली का?

**दिपक खांबीत :-**

माहिती घेऊन सांगतो.

**मा. सभापती :-**

सदरच्या कामाची कार्यवाही करण्यांत यावी.

**आक्षेप क्र. १० :-**

किरकोळ मागणी नोंदवही (बाजार लिलाव, तलाव लिलाव, बोटींग लिलाव बाबत.)

**मिलन म्हात्रे :-**

आता ठेका कुणाला दिला आहे.

**विजय पाटील :-**

सायमन अल्मेडा. ३१/०३/२००४ पर्यंतची मुदत आहे व एक लाख रुपये आपण ह्या तारखेपर्यंत भरायचे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आपण गेल्या वर्षी ठेका दिला तर तीन तीन महिन्यांमध्ये रक्कम कशी इन्स्टॉल करता. मागच्या वर्षीच्या लिलावात परत कॉन्ट्रीब्युट झाले होते का? ज्यांनी पैसे भरले नाही त्यांचे टर्मिनेशन केले का? वर्षाचे हफ्ते किती होते?

**विजय पाटील :-**

पंधरा हजार एका महिन्याचे सांगितले.

**मिलन म्हात्रे :-**

दोन वर्षाचे किती झाले?

**विजय पाटील :-**

एक लाख ऐंशी हजार झाली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

पाच लाख सतरा हजार पाचशे रुपये इतकी रक्कम दाखविण्यांत आलेली आहे. ती रक्कम वसुल करायची आहे त्याचे काय?

**प्रविण वैवुडे :-**

हा ठेका २००४ पर्यंत दिला आहे. २००४ पर्यंत ही रक्कम वसुल करायची अहे.

**मिलन म्हात्रे :-**

ही जी रक्कम दाखविण्यांत आलेली ती किती वर्षाची बाकी होती.

**प्रविण वैवुडे :-**

३१/०३/२००४ पर्यंत वसुल करायचे आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

तीन हफ्ते भरले तर मग एवढे पाच लाख सतरा हजार पाचशे रुपये कसे बाकी राहीले.

**विजय पाटील :-**

हा साहेब बोटींगचा हफ्ता आहे. २१/०३/२००४ पर्यंत रक्कम वसुल करायची आहे. चार लाख पस्तीस हजार रुपये भरले आहे आणि एक लाख रुपये बाकी आहे व ते त्यांनी ३१/०३/२००४ पर्यंत भरायचे आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

तुमच्याकडे अजून काही वसुली बाकी आहे का?

**विजय पाटील :-**

होय. सुर्वेची वसुली बाकी आहे.

**मा. सभापती :-**

सुर्वेवर काय कार्यवाही केली आहे?

**विजय पाटील :-**

त्याला नोटीस दिली आहे व जप्ती ऑर्डर काढली आहे. त्याच्या नावावर फ्लॅट नाही. त्यामुळे वसुली करायला प्रॉब्लेम होत आहे. हा विषय स्थायी समिती समोर ठेवायचा असा आम्ही विचार करत होतो.

**लिओ कोलासो :-**

स्थायी समिती पुढे सदरचा विषय येऊ दे.

**मा. सभापती :-**

स्थायी समितीमध्ये विषय घेण्यांत यावा.

**आक्षेप क्र. ९ :-**

नगरपरिषदेच्या मालमत्ताबाबत.

**लिओ कोलासो :-**

पाणी विभागाकडे जे काय मटेरियल आहे त्याची यादी आम्हांला दाखवा. उत्तनच्या ठिकाणी बरेच पाईप लाईन टाकले होते. त्याचे काय झाले आणि स्टोर्समध्ये प्रत्येक वस्तु नगवारीप्रमाणे ॲक्युरेट असायला पाहिजे.

**दशोरे :-**

पुढच्या सभेपर्यंत माहिती देतो.

**अशोक पाटील :-**

स्थिर मालमत्ता महानगरपालिकेच्या नावावर झाली आहे का?

**दिपक खांबीत :-**

आम्ही स्मरणपत्र लिहितो. मालमत्ता अधिकारी ही पोस्ट निर्माण करायला पाहिजे.

**मा. सभापती :-**

ज्या पदाधिकाऱ्याची पोस्ट निर्माण झाली आहे. ती पोस्ट भरुन घ्या असे आयुक्त साहेबांनी पत्र दिले आहे.

**आक्षेप क्र. ११ :-**

वाहन विभागाबाबत.

**मनिष दोशी :-**

वाहने लिलावात टाकली होती. त्याच्यातील सात वाहने गेली व दोन वाहने बाकी आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

लिलावाचा विषय आहे हा स्थायी समितीपुढे आला नाही.

**तुळशीदास म्हात्रे :-**

हा लिलाव कधी झाला आहे? आपणाकडून स्थायी समितीच्या सदस्यांना काहीच कळविले जात नाही.

**मा. सभापती :-**

आपल्याकउे जी वाहने आहेत ती वाहने लिलावात काढली कारण त्या वाहनांचा काही उपयोग नाही असे त्यांचे म्हणणे आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

टॅंकरची नोंद बरोबर आहे का? कारण दुसरीकडे आपले वाहन पडले असेल तर व त्याची नोंद असेल तर काय करायचे?

**मनिष दोशी :-**

वाहनांची नोंद केली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्याकडे किती ट्रॉली आहे त्याची लिस्ट काढा.

**संदिप शिंदे :-**

ट्रॉलीची लिस्ट आमच्याकडे आहे व त्याची नोंदही आहे.

**आक्षेप क्र. १२ :-**

नगरपरिषदेने घेतलेल्या कर्जाबाबत.

**मा. सभापती :-**

पंचवीस टक्के अट आहे रक्कम जमा करण्याची. ती तीन वर्षाची आहे.,

**आक्षेप क्र. १३ :-**

महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या लेखाबाबत.

**आक्षेप क्र. १४ :-**

विकास आकाराबाबत.

**लिओ कोलासो :-**

विकास कराबद्दल काय आहे? वसुली किती आली आहे?

**मा. सभापती :-**

तीन कोटी नऊ लाख रेकॉर्ड केले आहे.

**प्रविण वैवुडे :-**

बजेटची चर्चा झाली होती. तेव्हा विकास कराचे ठरले होते.

**सत्यवान धनेगावे :-**

साहेब वसुली करुन दाखविली आहे.

**आक्षेप क्र. १५ :-**

अग्निशामक विभागाबाबत.

**आक्षेप क्र. १६ :-**

भांडार विभागाबाबत.

**लिओ कोलासो :-**

एकत्रित मालमत्तेची व्हॅल्युएशन किती आहे.

(लिस्टचे वाचन करुन दाखविले)

**तुळशीदास म्हात्रे :-**

आपण ह्याच्यात ॲडिशन करा. शिक्षण विभागामध्ये काहीच नाही तिथे आपण काहीतरी पाठवा.

**दिनेश नलावडे :-**

शिक्षण खात्यामध्ये बसायला खुर्च्या नाहीत त्याची आपण सोय करावी.

**मा. सभापती :-**

तरतुद असेल तर खुर्च्या मागवून घ्या.

**आक्षेप क्र. १८ :-**

भुईभाडें करमणुक कर, जाहिरात कर, होर्डींग्ज, पे अँड पार्कच्या वसुलीबाबत.

**चंद्रकांत वैती :-**

ह्यामध्ये एक टक्का देखील वसुली झालेली नाही व कार्यकारी अभियंता व कर निर्धारक ह्याने लक्ष घालणे जरुरीचे आहे आणि खास करुन हे काम महानगरपालिकेने घेतल्यावर त्या कामात काय करता येईल का ते बघायला पाहिजे व जाहिरात कर, होर्डींग्ज आहे. त्याच्यावर संभ्रमित किती पैसे द्यायचे आहे. काही दुकांनांना पाच हजार, आठ हजार असे वेगवेगळे कर लावले आहे. दुकानांसमोर जाहिरात बोर्ड लावले तर ते कोणत्या स्वरुपाचे असेल, त्याचे धोरण काय असेल, काचेवर काय लिहिले आहे, आणि त्याच्यावर देखील आपण कर आकारणी करतो ते बरोबर नाही. आपण त्याचे ठराविक असे एक धोरण ठरवावे.

**मिलन म्हात्रे :-**

टॅक्सचे खाजगीकरण केल्यावर काय होईल ते ह्या कामावरुन समजते. कारण ठेकेदार कशा प्रकारे काम करुन घेतो हे आम्ही पाहिले आहे. जाहिरात कर, होर्डींग्जच्या कामाकरिता माझ्या दुकानावर सुद्धा ती मुले आली होती. मी त्यांना सांगितले नाही की, मी नगरसेवक आहे. ती मुले दुकानात येतात, स्वतःच्या मर्जीने मोजमाप करुन घेतात व पाचशे ते पाच हजार रुपये असे कर लावले आहे. अशोक इलेक्ट्रॉनिक्स या दुकानाला पाचशे रुपये जाहिरात कर लावला आहे. ते मी मुद्दामहून ह्याच्याकरिता सांगतो, कारण ज्या ज्या दुकानावर जाऊन हे त्यांना सांगून कर कमी लावतात. आणि ज्यावेळी ह्याची चौकशी होईल तेव्हा एकेकाचे कासे काढायला सुरुवात होईल. माझे दुकान आहे तेथे बोर्ड होता व तो बोर्ड काढला आहे. या बोर्डाचे पैसे मी पुर्वीपासून भरत आलो आहे. रितसर अर्ज दिला आहे. दोन वर्षाचा तो टॅक्स आला आहे. मी अर्ज दिला की, हा बोर्ड काढला आहे. तरीदेखील बिल आले आहे आणि आपण बोलता खाजगीकरण करायचे. पण त्याच्यात देखील त्रास आहे. कर आकारणी त्यावेळची काय झाली आहे ते आपण बघा.

**महेद्रसिंग चौहाण :-**

ऐसी ही शिकायत मैने दो बार कही है।

**मिलन म्हात्रे :-**

ह्याचे तुम्ही रिव्हेन्यु घ्या साहेब. ह्या डिपार्टमेंटला कोण मायबाप सरकार कोणी नाही का? त्याची फायनल ऑथोरिटी कुणाकडे आहे. त्याचा आपण निकाल लावा.

**चंद्रकांत वैती :-**

माझ्या माहितीचे दुकान आहे. तिथे आपला एक कर्मचारी गेला आणि काचेचे डोअर आहे त्याला एक हजार त्या कर्मचाऱ्यांने सांगितले. तुम्ही मला पैसे द्या मी तुमची रक्कम कमी करतो. त्या कर्मचाऱ्यावर कार्यवाही करावी असे माझे धोरण नाही. त्या दुकानदाराने मला फोन करुन सांगितले व तो प्रकार मी स्वतःने मिटवला. हे माझ्या मित्राचे प्रकरण होते. त्यामुळे मी त्या अधिकाऱ्याला भेटलो व सगळे व्यवस्थित केले. कर्मचाऱ्यांची ही अशी प्रवृत्ती असते त्यामुळे ह्याच्यावर अभ्यास करुन आपण उपाय ठरवावा. जाहिरात कर आपण कसे वसुल करता. मुद्रा आर्टस्, अनिल पंडित, महाशक्तीचे संपादकाने होर्डींग्ज लावले. जे अनधिकृतपणे बोर्ड लावतात तर आपण त्याच्यावर कार्यवाही करा. कारण जे पैसे भरुन बोर्ड लावतात त्यांचे काय ते आपल्या महानगरपालिकेला रक्कम मोजतात. त्यांचे बोर्ड शांतीनगरच्या लोकांनी काढून नेले तर त्याला जबाबदार कोण? आमचे ऑब्जेक्शन फक्त एकच आहे. आपण एक कोटी अठ्ठावीसने ठेका दिला आहे. तर कोणत्या अटीशर्ती मध्ये ठेका दिला आहे?

**याकुब कुरेशी :-**

प्रशासकिय राजवटीमध्ये घेतले आहे का?

**चंद्रकांत वैती :-**

प्रशासकिय राजवटीमध्ये घेतले तर त्याला जबाबदार कोण?

**दिनेश नलावडे :-**

जाहिरात बद्दल आहे ते बरोबर बोलले जात आहे. नगरपालिकेचे लोक जातात आणि मांडवली करतात. नगरपालिकेने ह्या संदर्भात योग्य ती नियमावली बनवली पाहिजे.

**लिओ कोलासो :-**

एजन्सीने बरोबर सर्वे केलेला नाही.

**मा. सभापती :-**

एक कोटी अठ्ठावीस लाख रुपये आपण ह्याचा बजेट ठरविला आहे. पण प्रत्येक विभागाकडून जाहिरात बाबत तक्रार केली. त्यामुळे त्याची संपूर्ण टिपणी तयार केली आहे व त्याच्यावर सही करायची आहे. त्याच्यासाठी मी स्वतः आयुक्त साहेबांकडे घेऊन जाणार आहे. मेन फलकावर जाहिरात कर व शोकेसवर जाहिरात कर व जे कर फिक्स करायचे आहे त्याची टिपणी तयार आहे. हा विषय घेऊन त्याच्यावर अधिकारी नेमावा असे मी स्वतः पत्र दिले आहे. अशा पद्धतीचा अधिकारी खात्याने नेमावे आणि आपण हा सदरचा विषय पुढच्या सभेत घेतोय.

**प्रकरण क्र. ७५ :-**

सन २००२-०३ या वित्तीय वर्षाच्या सर्वसाधारण लेख्याबाबत.

**ठराव क्र. :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका सन २००२-२००३ या वित्तीय वर्षाच्या सर्वसाधारण लेख्याबाबत अंतर्गत लेखा परीक्षक यांनी दिलेल्या अभिप्रायाचे वाचन करण्यांत आले. सदर अभिप्रायातील आक्षेपांतील बाबीची खातेनिहाय चर्चा करण्यांत आली.

आक्षेपांतील पूर्तता सर्व विभाग प्रमुखांनी एक महिन्यांच्या आत करुन दाखवावी असे सर्वानुमते ठरविण्यांत आले. त्यानुसार सदरच्या अहवालास मंजुरी देण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. लिओ कोलासो.** **अनुमोदन :- श्री. तुळशीदास म्हात्रे.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ७६ चे वाचन केले)

**प्रकरण क्र. ७६ :-**

सन २००२-०३ वार्षिक लेख्यांस मंजुरी मिळणेबाबत.

ठराव क्र.          :-

# वार्षिक लेखे एम.ए.सी. फॉर्म २८

## सन २००२-२००३

जमा                                                    (अंक लाखात)

| अ.क्र. | लेखाशिर्ष | अंदाज पत्रकीय तरतुद | प्रत्यक्ष जमा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | **अंदाजपत्रक 'अ'** | | |
| अ) | महापालिका दर व कर | ४८६०.९२ | ४४३६.९८ |
| ब) | विशेष अधिनियमाखालील वसुली | ३.०० | १.३० |
| क) | महापालिकेची मालमत्ता व सेवा, उपयोगिता यांच्यापासून मिळालेला महसुल | ५८२.१३ | ६१२.५७ |
| ड) | अनुदाने व अंशदाने | ५३२.७३ | ३५१.४२ |
| इ) | संकिर्ण अ असाधारण | १९८०.७५ | १९१०.७७ |
| | **एकूण (अ) अंदाजपत्रक जमा** | **७९५९.५३** | **७३१३.०४** |
| | **अंदाजपत्रक 'ब'** | | |
| | परिवहन सेवा | ५०.०० | - |
| | **अंदाजपत्रक 'क'** | | |
| अ) | पाणी पुरवठा | १६८२.४२ | १२८१.९६ |
| ब) | परवाना व इतर फी | २०२.१५ | १७७.२१ |
| क) | संकीर्ण | - | - |
| | **एकूण** | **१८८४.५७** | **१४५९.१७** |
| | **एकूण (अ, ब, क )** | ९८९४.१० | ८७७२.२१ |
| | **प्रारंभीची शिल्लक** | - | ४४१.४० |
| | **एकूण जमा** | **९८९४.१०** | **९२१३.६१** |

# वार्षिक लेखे एम.ए.सी. फॉर्म २८

## सन २००२-२००३

(अंक लाखात)

| अ.क्र. | लेखाशिर्ष | अंदाज पत्रकीय तरतुद | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|---|
| ५ | ६ | ७ | ८ |
| | **अंदाजपत्रक 'अ'** | | |
| अ | सामान्य प्रशासन आणि वसुलीचा खर्च | ६०६.४० | ३५०.०८ |
| ब | सार्वजनिक सुरक्षितता | ४०८.७३ | ३४८.७१ |

| | | | |
|---|---|---|---|
| क | आरोग्य व सोयी | ४५५४.३४ | ४१३७.३७ |
| ड | शिक्षण | १९७.०५ | १०३.०४ |
| इ | अंशदाने | २.५० | २.३६ |
| फ | संकिर्ण | २७२७.३९ | २४२४.६५ |
| | एकूण (अ) महसुली खर्च | ८४९६.४१ | ७३६६.२१ |
| | **अंदाजपत्रक 'ब'** | | |
| | परिवहन सेवा | ५०.०० | - |
| | **अंदाजपत्रक 'क'** | | |
| अ) | पाणी पुरवठा (महसुली) | १००१.४९ | ८६३.१५ |
| ब) | जलनिःस्सारण (महसुली) | २५.०० | १२०.८६ |
| क) | पाणी पुरवठा (भांडवली) | ७२२.२० | ४१२.५० |
| | एकूण | **१७४८.६९** | **१३९६.५१** |
| | **एकूण (अ, ब, क )** | १०२९५.१० | ८७६२.७२ |
| | **अखेरची शिल्लक** | - | ४५०.८९ |
| | **एकूण खर्च** | **१०२९५.१०** | **९२१३.६१** |

**सुचक :- श्री. अशोक पाटील.** **अनुमोदन :- श्री. लिओ कोलसो.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानून आजची सभा येथे संपल्याचे जाहिर करत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दु. ४.३० वा.**

**सभापती**
**स्थायी समिती,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रभारी सचिव,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**